MHSO100004142021

## वि.दि.दा.क्र.२६५/२०२१ मधील निशाणी क्र.१६ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१ याने सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध जो विना कैफीयतचा आदेश झाला आहे तो रद्द होऊन मिळण्यासाठी व त्याची कैफीयत दाखल करुन घेण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरचे दाव्यात तो हजर झाल्यानंतर सदरचे प्रकरणात तडजोडीची बोलणी चालू असल्यामुळे त्याला मुदतीत कैफीयत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्याच्याविरूद्ध सदरचे प्रकरण विना कैफीयत चालविण्याबाबतचा आदेश न्यायालयाने केला आहे. प्रतिवादीने जाणीवपूर्वक कैफीयत दाखल करण्यास विलंब केलेला नाही. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादीने जबाब दिलेला असून त्यामध्ये त्याने प्रतिवादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्याने पुढे म्हटले आहे की, सदरचा अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादीने त्याची कैफियत न दाखल करण्याचे संयुक्तीक कारण दिले नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्यास त्यांनी हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

 वि.दि.दा.क्र.२६५/२०२१ मधील
निशाणी क्र.१६ खालील आदेश

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. विना कैफीयत आदेश रद्द करणे आवश्यक आहे काय? | .....**होय.** |
| २. आदेश काय? | ....**अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबत

४. मी प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान वकील श्री.झंजे व वादीतर्फे विद्वान वकील श्री.सावंत यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.१ ला दि.२७.०६.२०२४ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर ९० दिवसाच्या आत म्हणजेच दि.२६.०९.२०२४ पावेतो प्रतिवादीने त्याची लेखी कैफीयत दाखल केली नाही. प्रतिवादी क्र.१ ने विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे त्याच्याविरुध्द विनाकैफियतीचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानंतर ता.२८.११.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्याचे लेखी म्हणणे दिलेले आहे. सदरचे मुळ दाव्याचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादीस त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्याच्याविरूद्ध झालेला विना कैफीयत आदेश रद्द करुन त्याची लेखी कैफीयत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. प्रतिवादीस जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रतिवादीच्या विरूद्ध झालेला विना कैफीयत हा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर

होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने त्याचे लेखी म्हणणे दाखल करण्यास २ महीने व २ दिवसांचा विलंब केलेला आहे. त्यामुळे त्याबाबत त्याने वादीला खर्चाची रक्कम देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.१६ चा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने वादीला एकूण खर्चाची रक्कम रु.१,०००/-(रु.एक हजार फक्त) देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.09 16:58:16 +0530

दि.०९.०९.२०२५.

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

 **वि.दि.दा.क्र.२६५/२०२१ मधील**

**निशाणी क्र.१६ खालील आदेश**

**शेरा**

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.०९.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.०९.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.०९.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.०९.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.०९.०९.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

माळशिरस.